स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **11–01–2013** रोजी सकाळी **10–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 12. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 13. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 2. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 3. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. संजय काकडे, उप निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक 291</u>** :– प्रभाग क्र.2 नारी गाव पिवळी नदीला संरक्षण भिंत बांधण्याच्या कामाकरिता प्राप्त 14 निविदांपैकी मे. मयुर कन्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.3 टक्के कमी दराची रु.47,24,074/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याच्या तसेच या कामास्तव मे. एन वास्तु यांची म.न.पा.चे मंजुर दरावर सल्लागार म्हणुन सेवा घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 292</u>** :– प्रभाग क्र. 2–अ, तारकेश्वर नगर जवळील पिवळया नदीवर रेज काजवे पाईप कल्व्हेटचे कामास्तव प्राप्त 15 निविदांपैकी मे. मयुर कंस्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 25.1 प्रतिशत ने कमी दरांची रु.33,08,598/– रकमेची निम्मतम निविदा मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 293</u>** :– नागपूर महानगरपालिकेकरिता कच्च्या पाण्याचे 112 दलघमी (Mm3) कायम स्वरुपी आरक्षणा व्यतिरिक्त शासनाकडून प्राप्त 78 दलघमी (Mm3) तात्पुरत्या पाणी साठयाचे आरक्षणापोटी उर्वरीत सुरक्षा ठेव रु. 28,26,640/– चे भुगतान जलसंपदा विभागाकडे (कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग) करण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 294</u>** :– प्रभाग क्र. 55 अ/ब, येथील लक्ष्मीनगर, बजाजनगर, सुरेन्द्रनगर व प्रतापनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण च्या कामास्तव रु.29,97,230/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 295</u>** :– मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिवांनी वाचुन दाखविला व त्यास समितीने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>– ठराव –</u>

नागपूर महानगरपालिकेने सन 2012 –2013 च्या आयव्ययकात महानगरपालिकेच्या यशवंत स्टेडियम येथे नागपूर महोत्सवाचे आयोजन करण्याकरिता मंजुरी प्रदान केली असून आयव्ययकात आवश्यक ती तरतुद केली आहे.

नागपूर महोत्सव दिनांक 23.01.2013 ते 28.01.2013 पर्यंत आयोजित करण्यात येत असून यामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम मुंबई,पुणे व नागपूर येथील स्थानिक कलावंत यांचे सहभागाने संपन्न करण्याचा मानस आहे.

या कार्यक्रमाकरिता पद क्र. 776 मधून रु. 1.00 कोटी खर्च अपेक्षित आहे त्यापैकी कलावंत मानधन रु.85,17,220/– अग्रीत धनादेशाव्दारे व इतर खर्च लक्षात घेता व वेळेची कालमर्यादा पाहता हा खर्च लघुनिविदा काढून येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देण्यास स्थायी समितीची ही सभा त्यास एकमताने मंजुरी प्रदान करते.

सुचक :– हस्ता /– सौ. प्रगती पाटील
अनुमोदक :– हस्ता /– सतीश होले.
हस्ता /– सुजाता कोंबाडे
हस्ता /– सरोज बहादुरे
हस्ता/– हर्षदा जैस्वाल

**<u>ठराव क्रमांक 296</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर